।। श्रम ही आराधना ।।

# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ

(संलग्न भारतीय मजदूर संघ) (र.नं.पी.एन.३९७८)

| निलेश खरात | सचिन मेंगाळे | उमेश आणेराव | राहुल बोडके | सागर पवार |
| --- | --- | --- | --- | --- |
| अध्यक्ष | सरचिटणीस | कार्याध्यक्ष | संघटन मंत्री | कोषाध्यक्ष |
| मो.: ९८२२४१८३९५ | मो.: ९४२२०३७०२९ | मो.: ९९७०००४४७४ | मो.: ९५५२८७४८२१ | मो.: ९८९०१६९६६७ |

● mvkksangh@gmail.com ● विश्वकर्मा भवन, १८५, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० ● www.mvkksangh.com


Ref. : 224 Date : 04/03/2022

प्रती

| | | |
| --- | --- | --- |
| मा.ना.उद्धवजी ठाकरे साहेब<br>मा.मुख्यमंत्री<br>महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई. | मा.ना.डॉ.नितीनजी राऊत<br>मा.ऊर्जामंत्री<br>महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई. | मा.ना.हसनजीमुश्रीफ<br>मा.कामगार मंत्री<br>महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई. |
| मा.ना.प्राजक्त तनपुरे<br>मा. राज्य मंत्री, ऊर्जा<br>महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई. | मा.ना. ओमप्रकाश उर्फ बच्चूभाऊ कडू,<br>मा. राज्य मंत्री, कामगार<br>महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई. | मा.मुख्य सचिव<br>महाराष्ट्र शासन,मंत्रालय,<br>मुंबई. |
| मा. कामगार आयुक्त<br>महाराष्ट्र शासन, बांद्रा, मुंबई. | मा. प्रधान सचिव ऊर्जा<br>महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई. | मा. कामगार सचिव,<br>महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई. |

**विषय : उर्जा मंत्रालयाकडे प्रलंबित असलेल्या समस्यां सोडवणे साठी मा.कामगार आयुक्त कार्यालय, बांद्रा ते विधानसभा मुंबई असा हजारो वीज कंत्राटी कामगारांचा २१ मार्च २०२२ रोजी पायी मोर्चा काढणे बाबत.**

संदर्भ :

१ ) महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे पत्र क्रमांक २२२ दिनांक ०२/०२/२०२२.

२ ) वीज कंपनी प्रशासना सोबत कंपनी पातळीवरील समस्यां बाबत संघटनेची १८ फेब्रुवारी रोजी झालेली चर्चा

३ ) महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे पत्र क्रमांक २२३ दिनांक २१/०२/२०२२.

मा.महोदय

सप्रेम नमस्कार

महावितरण,महापारेषण, महानिर्मिती या तिन्ही वीज कंपनीतील नियमित रिक्त पदावर हजारो वीज कंत्राटी कामगार व सुरक्षा रक्षक हे प्रामाणिकपणे कामे करत असून त्यांच्या समस्या ऊर्जामंत्री यांनी समजून घ्याव्यात व त्यावर तोडगा काढावा व ऊर्जा खात्यातील कष्टकरी पीडित शोषित वीज कामगारांना न्याय मिळावा म्हणून संघटनेच्या माध्यमातून आम्ही ऊर्जामंत्री या नात्याने आपणाकडे व शासनाकडे संघटनेने मागील २ वर्षांपासून अनेक पत्रव्यवहार केले, आंदोलने केली मात्र आपण ऊर्जामंत्री या नात्याने या पत्रांची व आंदोलनाची अद्याप दखल घेतली नाही.

संदर्भ क्रमांक १ च्या पत्रानुसार वीज कंपनी प्रशासनाने प्रशासना १८ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ११ वाजता वीज कंपनी प्रशासनाने संघटने सोबत चर्चा केली. आज वर संघटनेने ज्या समस्या पत्रव्यवहारा द्वारे मांडल्या यातील ज्या समस्या वीज कंपनी प्रशासन पातळीवर होत्या त्या बाबत या मिटिंग मध्ये चर्चा झाली. वीज प्रशासनाने आमचे

समाधान करण्या बाबत आश्वासन दिले. परंतु या पूर्वी दिलेलली आश्वासने व पूर्वानुभव पहाता आम्ही यात तात्पुरते समाधान मानले.

कामगारांवर वर्षानुवर्षे होत असलेल्या आर्थिक, सामाजिक,मानसिक व अन्य इतर अन्याया बाबत संघटनेने वेळोवेळी प्रशासनाला सर्व समस्यां कळवल्या. मात्र वेळोवेळी यातील काही समस्या व प्रश्न हे शासन पातळीवरील व धोरणात्मक बाबींचे निर्णय असून या बाबत संघटनेने शासनाकडे पाठपूरावा करावा असे प्रशासनाने संघटनेला १८ फेब्रुवारी २०२२ रोजी सुचवले.

दिनांक २२ फेब्रुवारी रोजी संघटनेने आत्मदहनाचे पत्र दिल्यानंतर शासन पातळीवरील आपण आमच्या खात्याचे व आमचे प्रमुख पालक व ऊर्जामंत्री या नात्याने आमच्या संघटने सोबत चर्चा करन या शोषित पीडित कामगारांना न्याय द्याल हे आम्हाला अपेक्षित होते. वर्षानुवर्षे प्रलंबित शासन पातळीवरील काही समस्या, प्रश्न व यापुर्वी शासन व प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता व्हावी व कामगारांना उचित न्याय मिळावा या साठी संघटनेच्या प्रतिनिधींनी दिनांक ८ जुलै २०20 रोजी देखील आपली भेट घेतली, आपण संघटनेसोबत सविस्तर मिटिंग घेण्याचे आश्वासन आम्हाला मंत्रालयातील आपल्याच दालनात दिले मात्र ते आश्वासन आपण अद्यापही पाळले नाही.

संघटना आपल्या माध्यमातून राज्यातील महावितरण महापारेषण व महानिर्मिती कंपनीतील रिक्त पदी कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कामगारांना योग्य न्याय देऊ इच्छित आहे. आपण या राज्याचे ऊर्जामंत्री व आमचे पालक या नात्याने शासन व प्रशासन स्तरावर त्वरित चर्चा करून या शोषित पीडित कष्टकरी कंत्राटी कामगारांचे धोरणात्मक प्रलंबित प्रश्न निकाली काढावेत व आम्हला न्याय द्यावा अशी राज्यातील सर्व वीज कंत्राटी कामगारांच्या वतीने आपणास नम्र विनंती आहे.

**अन्यथा नाईलाजास्तव संघटनेच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील तिन्ही वीज कंपनीतील हजारो वीज कंत्राटी कामगार सोमवार दिनांक २१ मार्च २०२२ रोजी मा.कामगार आयुक्त कार्यालय, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा, मुंबई येथे सकाळी १0 वाजता एकत्र येऊन तेथुन विधानसभेकडे पायी मोर्चा काढतील व विधानसभे समोर तीव्र निदर्शने करतील याची आपण नोंद घ्यावी.**

तिन्ही वीज कंपनीतील कंत्राटी कामगारांचे शासन स्तरावर वर्षानुवर्षे प्रलंबित धोरणात्मक मुद्दे व समस्या खालील प्रमाणे आहेत यावर उर्जामंत्रालय व शासनाने त्वरित योग्य निर्णय घ्यावा. कामगारांवर पायी मोर्चा काढण्याची वेळ येऊ नये या साठी आपण प्रयत्न करून तातडीने संघटनेच्या शिष्ट मंडळास चर्चेला पाचारण करावे ही नम्र विनंती.

तिन्ही वीज कंपनीतील वीज कंत्राटी कामगारांचे शासन स्तरावर वर्षानुवर्षे प्रलंबित धोरणात्मक मुद्दे, समस्या

१ ) तिन्ही वीज कंपनीत रिक्त पदी वर्षानुवर्ष काम केलेल्या सर्व अनुभवी वीज कंत्राटी कामगारांना इतर शासकीय अत्यावश्यक खात्या प्रमाणेच कोविड योद्धा / फ्रंट लाईन वर्कर हा दर्जा देऊन विशेष बाब म्हणून शासन सेवेत कायम स्वरूपी सामावून घ्यावे.

२ ) या कामगारांना वीज कंपनीत सामावून घेण्याच्या उद्देशाने स्थापन केलेल्या मनोज रानडे समिती चा अहवाल सकारात्मक असून कंपनीचे व कामगारांचे हित पहाता या अहवालानुसार सर्व कामगारांना त्वरित न्याय मिळावा.

३ ) वीज कंत्राटी कामगारांना समान काम समान वेतन मिळावे या करिता नियुक्त अनुराधा भाटीया समिती चा अहवाल शासनाकडे अनेक वर्षे प्रलंबित आहे या वर त्वरित कार्यवाही होऊन समान काम समान वेतन तिन्ही वीज कंपनीत कार्यरत कामगारांना लागू करावे.

४ ) कंत्राटी कामगारांना कंत्राटदार मुक्त रोजगार दिल्यास कंत्राटदारांच्या मार्फत होणारी त्यांची आर्थिक पिळवणूक थांबेल व वीज कंपनीच्या खर्चात सुमारे २५% बचत होईल.अशी कंपनीच्या आर्थिक हिताची सूचना संघटनेने या पूर्वी वारंवार केली या साठी.

अ) पूर्वाश्रमीच्या वीज मंडळात शासन मान्यता मिळालेल्या रोजंदारी कामगार पद्धती प्रमाणे कंत्राटदार विरहित रोजगार द्यावा या साठी चर्चा व्हावी

ब ) अथवा उपकंपनी नेमून कंत्राटदार विरहित कंत्राटी कामगार भरती करावी या साठी चर्चा व्हावी.
५ ) महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या सभापती मा.नीलम ताई गोऱ्हे यांनी राज्य कामगार मंत्री यांना हिवाळी अधिवेशन २०२१ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार वीज कंत्राटी कामगारांच्या हितार्थ त्वरीत अशा महामंडळाची स्थापना करावी. त्यात भारतीय मजदूर संघाच्या प्रतिनिधींचा समावेश करावा जेणे करून कामगार कंत्राटदार विरहित होतील व त्यांना आर्थिक स्थैर्य व शाश्वत रोजगार ( जॉब सिक्युरिटी ) मिळेल.
६ ) संघटनेने २०१९ साली पुणे ते मुंबई असा पायी मोर्चा काढला होता त्यावेळी तत्कालीन ऊर्जामंत्री मा.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सोबत २७ फेब्रुवारी २०१९ रोजी झालेल्या सकारात्मक चर्चेनुसार प्रशासनाने अंमलबजावणी करावी व त्या चर्चेनुसार कंत्राटी कामगारांना कंत्राटदार विरहित शाश्वत रोजगार ( जॉब सिक्युरिटी ) मिळावा.
७ ) कोरोना काळात सेवे दरम्यानच्या अपघातात मृत पावलेल्या वीज कंत्राटी कामगारांच्या वारसांना शासन सेवेत सामावून घ्यावे तसेच त्यांच्या वारसाला शासनाकडून आर्थिक मदत जाहीर करावी.
जनसेवा करतांना अपघातामध्ये जखमी झालेल्या वीज कंत्राटी कामगारांना देखील शासन स्तरावर आर्थिक मदत करावी
८ ) महाराष्ट्र शासनाच्या विमा संचालनालयाचा दहा लाखाचा विमा जसा कायम कामगारांना लागू आहे त्याच धर्तीवर तिन्ही वीज कंपनीतील वीज कंत्राटी कामगारांना हा १० लाखाचा विमा देखील लागू करावा
महाविकास आघाडी सरकार स्थापने पासून मागील २ वर्षात या शोषित पीडित वीज कंत्राटी. पीडित कामगारांच्या समस्यां समजून घेण्यासाठी शासनास अजिबात वेळ मिळत नाही ही खंत राज्यातील सर्व कामगारांना व संघटनेला आहे. तरी शासनाने याची दखल घेऊन या समस्यां सोडवण्या साठी प्रयत्न करावे. संघटने दिलेल्या सकारात्मक पर्यायाचा विचार करावा अन्यथा विधानसभेवर पायी मोर्चा अटळ असेल आपण व शासनाने याची आपण नोंद घेऊन त्वरित शासन पातळीवर संघटना प्रतिनिधी सोबत चर्चा करावी ही विनंती.

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी**

आपले

| | |
|---|---|
| अध्यक्ष | सरचिटणीस |
| निलेश खरात | सचिन मेंगाळे |
| महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ. | महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ. |
| Mob.: 9822418395 | Mob.: 9422037029 |

१. मा.विधानसभा अध्यक्ष, मुंबई
२. मा.विधानपरिषद अध्यक्ष.मुंबई
३. मा.देवेंद्रजी फडणवीस, माजी मुख्यमंत्री तथा विधानसभा विरोधीपक्ष नेते, मुंबई.
४. मा.प्रवीणजी दरेकर, विधान परिषद विरोधी पक्ष नेते मुंबई.
५. मा.पोलीस आयुक्त, मुंबई
६. मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, निर्मळ नगर पोलीस स्टेशन बांद्रा
७. मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मरीन ड्राइव्ह पोलीस स्टेशन, मुंबई.
८. मा.वाहतूक पोलीस नियंत्रण कक्ष मुंबई
९. मा.सुरक्षा अधिकारी मंत्रालय मुंबई.
१०. मा. व्यवस्थापकीय संचालक, महावितरण / महापारेषण / महानिर्मिती.

११. मा. संचालक मानव संसाधन विभाग, महावितरण / महापारेषण / महानिर्मिती.
१२. मा. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण / महापारेषण / महानिर्मिती.
१३. मा.अध्यक्ष / सरचिटणीस भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश
१४. मा.अध्यक्ष / सरचिटणीस महाराष्ट्र वीज कामगार महासंघ महाराष्ट्र प्रदेश
१५. मा.अण्णाजी देसाई ज्येष्ठ मार्गदर्शक,
महाराष्ट्र वीज कामगार महासंघ व वीज कंत्राटी कामगार संघ. महाराष्ट्र प्रदेश
१६. मा.विलासजी झोडगेकर ज्येष्ठ मार्गदर्शक,
महाराष्ट्र वीज कामगार महासंघ व वीज कंत्राटी कामगार संघ. महाराष्ट्र प्रदेश